# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

(दुपार)

**दिनांक २२.०९.२०२६ मंगळवार**

**मा. न्यायालयातुन फसवणुकीचे गुन्ह्यातील आरोपींना सश्रम कारावासाची शिक्षा :—**

दिनांक २१.०९.२०२६ रोजी मा. अति. जिल्हा व सत्र न्यायाधीश, नागपुर, श्री मोहतेसिम बदर साहेब यांनी त्यांचे कोर्टाचे विशेष केस क्र. ४५/२०२४ मधील, पोलीस ठाणे अंबाझरी येथील अप. क्र. ६४/२०१० कलम ४२०,३४ भा.दं.वि. या गुन्ह्यातील आरोपी मधुकर बानिराम देव्हारे, वय ४६ वर्षे २) सौ. सुनंदा मधुकर देव्हारे, वय ४४ वर्ष रा. नागपूर यांचेविरूध्द साक्षी पुराव्याअंती गुन्हा शाबीत झाल्याने, आरोपींना कलम ४२०, ३४ भा.दं.वि. कायद्यान्वये कलम २४८(२) सीआरपीसी नुसार ०३ महिने सश्रम कारावासाची शिक्षा व प्रत्येकी ५०००/—रू. दंड आणि दंड न भरल्यास १० दिवस अतिरीक्त कारावासाची शिक्षा ठोठावली.

वर नमुद आरोपीतांनी संगनमत करुन, त्यांचे मालकीचे मौजा बिडीपेठ येथील घराचे बनावट कागदपत्रे तयार करुन, ते खरी असल्याचे भासवुन, 'दि विदर्भ को—ऑपरेटीव्ह सोसायटी' येथे गहाण ठेवुन ३,२५,०००/— रु. गृहकर्जाची उचल केली होती. त्यानंतर दिनांक १९.०३.२०१० चे १५.२० वा. चे सुमारास आरोपीतांनी नमुद घर दुसऱ्या संस्थेला गहाण असतांना, त्या घराची प्रमाणित कागदपत्रे प्राप्त करुन, त्यावर 'निर्मल उज्वल सहकारी पतसंस्था' येथुन २,७०,०००/—रू. उचल केली. नमुद रकमेची कोणतीही परतफेड न करता संस्थेचा अन्यायाने विश्वासघात करुन, आर्थिक फसवणुक केली. अशा फिर्यादी व्यवस्थापक सौ. नंदा दिनेश बांते, वय ३९ वर्ष, यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे अंबाझरी येथे आरोपींविरूध्द गुन्हा नोंदविण्यात आला होता. आरोपींना दिनांक १९.०३.२०१० रोजी अटक करण्यात आली होती.

गुन्हयाचे तत्कालीन तपासी अधिकारी यांनी मा. कोर्टात तपासाअंती दोषारोपपत्र सादर केले होते. सदर खटल्यात सरकारी अभियोक्ता म्हणून ॲड. श्री आष्टणकर यांनी तर, आरोपीतर्फे ॲड. श्री. करकरे यांनी काम पाहिले. सदर गुन्ह्यात कोर्ट पैरवी अधिकारी मपोहवा. रंजना यांनी काम पाहिले

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची म.दा.का., जुगार व मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक २१.०९.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. व अंमली पदार्थ कायद्यान्वये १२ केसेसमध्ये १२ ईसमावर कारवाई करून एकुण १,०६,५३०/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. जुगार कायदा अन्वये ०३ केसेसमध्ये १३ इसमांवर कारवाई करून एकुण ७२,०६५/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

**वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये विना हेल्मेट गाडी चालविणे कलम १२९/१७७ मोवाका अन्वये १८६५ केसेस, ड्रंकन ड्राईव्ह कलम १८५ मोवाका अन्वये १९ केसेस, सिग्नल जंपींग कलम २३९/१७७ मोवाका अन्वये १५ केसेस, विना परवाना वाहन चालविणे कलम १३० मोवाका अन्वये ४७ केसेस, ऑन रोड पार्कींग कलम १२२/११७ मोवाका अन्वये २१९ केसेस, रॉंग साईड कलम ४/१२२ मोवाका अन्वये २३ केसेस, अवैध प्रवासी वाहतुक कलम १९४ए मोवाका अन्वये ४१ केसेस, ड्रायव्हींग विदाऊन युनिफार्म कलम**

**२१/१८ मोवाका अन्वये १२ केसेस, ट्रिपलसिट वाहन चालविणे कलम १२८/१७७ मोवाका अन्वये ५२ केसेस, बेदरकारपणे वाहन चालविणे कलम १८४ मोवाका ०४ केस, फॅन्सी नंबरप्लेट कलम ५१/५० सीएमव्हीआर अन्वये १३ केसेस, विटाऊट सिटबेल्ट ड्रायव्हींग कलम १९४बी(१) मोवाका अन्वये २२ केसेस, वाहन चालवितांना भ्रमणध्वनीचा वापर करणे ०४ केस, व इतर कलमांखालील गुन्हे असे एकुण २,४७२ वाहन चालकांवर कारवाई करून त्यांचेकडून एकूण रू. २,१६,७००/—रू. इतके तडजोड शुल्क वसूल केले आहे.**

**दिनांक २१.०९.२०२६ चे २३.०० वा. ते दिनांक २२.०९.२०२६ चे ०५.०० वा. चे दरम्यान, केलेल्या रात्रगस्तीमध्ये कलम १३५ म.पो.का. कायद्यान्वये ०१ इसमावर कारवाई करण्यात आलेली आहे**.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) नविन कामठी पोलीसांची कामगीरी :— मेडीकल हॉस्पीटल येथे उपचाराकरीता दाखल म.को.का. चे गुन्ह्यातील पळुन गेलेल्या आरोपीस अटक.**

पोलीस ठाणे अजनी हद्दीत मेडीकल हॉस्पीटल वार्ड क्र. १० येथे म.को.का. गुन्ह्यातील आरोपी बोमट्या उर्फ शेख समीर शेख रहीम, वय २४ वर्षे, रा. चित्तरंजन नगर, कामठी, नागपुर, ह.मु.— मध्यवर्ती कारागृह, नागपुर याचा उपचार सुरू असतांना, दिनांक १९.०९.२०२६ चे ०९.३० वा. ते १०.३० वा. चे दरम्यान, वार्डातील सफाई काम करणारे कर्मचारी यांनी आरोपी सुरक्षा गार्ड करीता असलेले पोलीस अंमलदार यांना 'झाडु पोछा करायचा आहे, तुम्ही बाहेर थांबा' असे म्हटल्याने, अंमलदार हे वार्डचे बाहेर थांबले होते. दरम्यान आरोपी हा वॉशरूमचे ग्रिल नसलेल्या खिडकीतुन पोलीसांचे कायदेशिर रखवालीतुन पळुन गेला होता. फिर्यादी पोअं. अब्दुल सोहेल निसार, वय ३० वर्षे यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे अजनी येथे आरोपीविरूध्द कलम २६२ भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे समांतर तपासात नागपुर शहर पोलीसांनी आरोपीचे शोधकामी वेगवेगळी पथके तयार करून, त्याचा शोध सुरू केला होता. नविन कामठी पोलीसांनी त्यांना प्राप्त खात्रीशीर माहीतीवरून, आरोपीस दुर्ग (छत्तीसगढ) येथुन ताब्यात घेतले व पुढील कार्यवाहीस्तव त्यास अजनी पोलीसांचे ताब्यात दिले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्रीमती विनीता शाहु अपर पोलीस आयुक्त (उत्तर प्रभाग), मा. श्री. रमेश धुमाळ, पोलीस उप आयुक्त (परि.क्र. ६) यांचे मार्गदर्शनाखाली, मा. श्री. अंकुश खेडकर, सहायक पोलीस आयुक्त, कामठी विभाग यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. श्री. महेश आंधळे, पोउपनि. योगेश नाल्टे, पोअं. विवेक, आशिष व तुषार यांनी केली.

**३) कुख्यात गुंड हद्दपार :—**

पोलीस ठाणे बेलतरोडी हददीत, **आर.बी.आय., हरीहर नगर, बेलतरोडी रोड, नागपूर येथे राहणारा गुन्हेगार ईसम नामे रित्वीक सुरेंद्र हरणे, वय २२ वर्षे** याचेविरूध्द पोलीस ठाणे बेलतरोडी येथे गंभीर दुखापत करणे, बेकायदेशीररित्या शस्त्र बाळगणे, गैरकायद्याची मंडळी जमवुन दंगा करणे, हातबुक्कीने मारुन शिवीगाळ करुन धमकी देणे, चोरी करणे, दरोड्याची पुर्वतयारी करणे, मारपिट करणे ईत्यादी गंभीर स्वरूपाचे विविध गुन्हे दाखल असुन, त्याचेवर वारंवार कारवाई करूनही त्याचे प्रवृत्तीत कोणतीही सुधारणा झाली नाही. त्याचेमुळे स्थानिक नागरिकांचे जिवीतास व मालमत्तेस धोका निर्माण होऊन नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाल्याने त्यास स्थानिक परिसरात ठेवणे धोकादायक असल्याने तसेच, नमुद गुन्हेगार इसमाचे वर्तणुकीत सुधारणा व्हावी, याकरीता

बेलतरोडी पोलीसांनी आरोपीविरूध्द हद्दपार प्रस्ताव तयार करून, मा. पोलीस उपायुक्त, परिमंडळ क्र. ०४ नागपुर शहर याचेकडे सादर केला. मा. पोलीस उपायुक्त, परीमंडळ क्र. ०४, नागपुर शहर यांनी हददपार आदेश क्र. १८/२०२६ दिनांक २१.०९.२०२६ अन्वये गुन्हेगारास नागपूर शहर व नागपुर ग्रामीण हद्दीतुन ०२ वर्षाकरीता हद्दपार करण्याचा आदेश पारीत केला आहे.



रित्वीक

**४) गुन्हेशाखा घरफोडी विरोधी पथकाची कामगीरी :— घरफोडीचा गुन्हा उघडकीस.**

दिनांक १८.०९.२०२६ चे २३.४५ वा. ते १९.०९.२०२६ चे ११.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे कोराडी हद्यीतील सरस्वती नगरी क्र. २, गोधनी ते बोखारा रोडवरील फिर्यादी हे त्यांचे पत्नीचे नावे असलेल्या 'स्टार बार ॲन्ड रेस्टारेंट' या आस्थापनेच्या शटरला कुलुप लावून आपले घरी गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने, नमुद आस्थापनेचे शटर उचकटवून, आत प्रवेश करुन, वेगवेगळ्या कंपनीची विदेशी दारु व काऊंटरमधील रोख १२,५००/—रु. असा एकुण १९.९२०/—रु. चा मुद्येमाल चोरुन नेला. याप्रकरणी फिर्यादी सागर शरदराव मानकर, वय ४० वर्ष, रा. प्लॉट क्र. ९६, कलेक्टर कॉलनी, गजानन मंदीर जवळ, गोधनी रेल्वे, नागपूर यांनी दिलेल्या तक्रारीवरुन अज्ञात आरोपीविरुध्द पोलीस ठाणे कोराडी येथे कलम ३०५(अ),३३१(३),३३१(४) भान्यासं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्हयाचे समांतर तपासादरम्यान, गुन्हेशाखा घरफोडी विरोधी पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक तपास करुन व मिळालेल्या गुप्त बातमीवरुन, गुन्ह्यात विधीसंघर्षग्रस्त बालक समाविष्ट असल्याचे निष्पन्न करुन, दोन विधीसंघर्षग्रस्त बालकांना ताब्यात घेतले. त्यांना विचारपुस केली असता, त्यांनी त्यांचा साथीदार विधीसंघर्षग्रस्त बालकासह संगणमताने वर नमुद गुन्हा केल्याचे कबुल केले. त्यांचे ताब्यातुन रोख २९५०/—रु. व विदेशी दारु बॉटल असा एकुण ३,७५०/— रु. असा मुद्येमाल जप्त करण्यात आला. दोन्ही विधीसंघर्षग्रस्त बालकांना मुद्येमालासह पुढील कार्यवाहीस्तव कोराडी पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरु आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. दिलीप चंदन, सपोनि. नितीन चुलपार, पोहवा. राकेश ठाकुर, गणेश बरडे, प्रशांत गभणे, पोअं. पंकज निकम, अमन राऊत व चापोअं. सुधिर पवार यांनी केली.

**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे मानकापुर :— शस्त्र बाळगुन धुमाकुळ घालणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक २१.०९.२०२६ चे १८.०० वा. चे सुमारास, मानकापुर पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना इंदीरा नगर झोपडपट्टीजवळ एक इसम शिवीगाळी करुन धूमाकूळ घालतांना दिसुन आला. पंचासमक्ष त्यास ताब्यात घेऊन, त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव बबलु ईशुलाल जगने, वय २९ वर्षे, रा. ताजनगर गली क्र. ५, मानकापुर, नागपूर असे सांगीतले. त्याची अंगझडती घेतली

असता, त्याचे पॅन्टचे आत कंबरेत लपविलेला एक लोखंडी चाकु किंमती २००/—रू. चा मिळून आल्याने जप्त करण्यात आला.

आरोपी हा कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने चाकु बाळगुन धुमधाम करतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे मानकापुर येथे आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे एमआयडीसी :— प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक २२.०९.२०२६ चे २२.१५ वा. चे सुमारास, पोलीस ठाणे एमआयडीसी पोलीसांचे बिट मार्शल पेट्रोलींग करीत असता, पोलीस ठाणे हद्दीत हिंगणा रोड ते राजीव नगर बसस्टॉप जवळ, रॉयल हॉटेल समोर, एक इसम अपघात होऊन गंभीर जखमी अवस्थेत मिळून आला. जखमीची ओळख पटविली असता, त्याचे नाव मुकेश रुपचंद कणसरे, वय ३० वर्ष, रा. नगपुरा, ता. लालबर्रा, जि. बालाघाट, मध्यप्रदेश असे निष्पन्न झाल्याने त्याचे नातेवाईकांना सुचित करुन, जखमीस उपचारकामी एम्स हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी जखमी मुकेश रुपचंद कणसरे यास तपासुन मृत घोषित केले. अपघाताविषयी परिसरात विचारणा केली असता, कोणीतरी अज्ञात वाहन चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन मुकेश रुपचंद कणसरे यास धडक देवुन, गंभीर जखमी करुन पळुन गेल्याचे समजले.

याप्रकरणी मृतकाचे नातवाईक शैलेंद्र तुलसीदास बसेने, वय २६ वर्ष, ह.मु. प्रमोद पांडे यांचे घरी किरायाने, गुप्ता किराणा जवळ, न्यु कैलास नगर, मानेवाडा, अजनी, नागपूर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे एमआयडीसी येथे अज्ञात वाहन चालक आरोपीविरूध्द कलम १०६(१) भा.न्या.सं., सहकलम १३४, १७७, १८४ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**३) पोलीस ठाणे बेलतरोडी :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक २१.०९.२०२६ चे १२.०० वा. ते १५.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे बेलतरोडी हद्दीत हल्ली मुक्कामी प्लॉट क्र. २०, काचोरे ले—आऊट, छत्रपती भवन, नागपूर येथे राहणारे फिर्यादी गुरुदेव माणिक मते, वय ३४ वर्ष हे आपले कामावर आणि त्यांची पत्नी आपले राहते घराला कुलुप लावुन, शेजारील गल्लीमध्ये भाचीकडे गेल्या असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे राहते घराचे मुख्य दाराचे कुलुप तोडुन, घराचे आंत प्रवेश करून, बेडरूममधील लोखंडी आलमारीतील सोन्या—चांदीचे वेगवेगळे दागिने एकुण किंमती ४,८३,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे बेलतरोडी येथे पोउपनि. शिरीष सलगर ९६७३९२१४०७ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(३) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**पोलीस ठाणे धंतोली :—** दिनांक २१.०९.२०२६ चे १५.०० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे धंतोली हद्दीत, मुंजे चौक येथील फुटपाथवर एक अनोळखी पुरूष वय अंदाजे ६० वर्षे वयाचे, बेशुध्द अवस्थेत मिळुन आल्याने, त्यांना उपचाराकरीता मेडीकल हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषीत केले. मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही. मृतकाचे वर्णन—रंग—सावळा, डोक्याचे केस—पांढरे व बारीक, बांधा—सडपातळ, दाढी मिशी—पांढरी व बारीक, अंगात—मळकट निळ्या आकाशी रंगाचा फुलबाहीचा शर्ट व निळ्या रंगाचा मळकट फुलपॅन्ट घातलेला आहे. नमुद मृतकास ओळखणाऱ्यांनी पोलीस ठाणे धंतोली येथे संपर्क साधावा.

याप्रकरणी प्राप्त वैद्यकरय सुचनेवरून पोलीस ठाणे धंतोली येथे मपोउपनि. शकुंतला मोवाडे यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**(मिसिंग)**

**पोलीस ठाणे जरीपटका :—** सौ. शिल्पा विनोद डुबरे, वय ४५ वर्षे रा. प्लॉट  नं. २६, नझुल ले आऊट, इटारसी पुल जवळ, जरीपटका, नागपूर ह्या दिनांक १९.०९.२०२६ चे ११.४० वा. पासुन पोलीस ठाणे जरीपटका हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेल्या. घरी परत आल्या नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आल्या नाही. **वर्णन** रंग—गोरा, चेहरा—लांबट, बांधा—सडपातळ, उंची—५ फुट ५ इंच, केस—काळे लांब, अंगात—गुलाबी रंगाचा कुर्ता व पांढरा पायजामा घातलेला आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलतात.



सौ. शिल्पा

**स्वा/—**

**( नितीन चुलपार )**

**सहा.पोलीस निरीक्षक,**

**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**

**नागपुर शहर.**